# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०९/२०२४ (रविवार)**

## अवैध अग्नीशस्त्र बाळगणा—या आरोपीविरूध्द कारवाई

पोलीस स्टेशन खापरखेड्याचे डी.बी पथक यांना दिनांक ०७/०९/२०२४ रोजी गुप्त सुत्राव्दारे माहीती मिळाली की आशिष विजय शास्त्री वय २३ वर्ष रा. दहेगाव रंगारी यांचेकडे देशी माउझर आहे अश्या माहीतीवरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथील डी बी पथकाने आशिष शास्त्री यास ताब्यात घेऊन सविस्तर विचारपुस केले असता त्याने उडवाउडवीचे उत्तर दिल्याने त्यास सखोल विचारपुस केली असता त्याने कबुल केले की माझाकडे एक देशी लोखंडी माउझर आहे व ती मी माझा घरी लपवुन ठेवलेली आहे अशी कबुली दिल्याने पो.स्टे खापरखेड्याचे अधिकारी व डी बी पथक हे दहेगाव रंगारी वार्ड क ४ येथे आरोपी आशिष शास्त्री यांचे सोबत त्याने सांगितल्याप्रमाणे पंचासह आरोपीच्या घरी गेलो असता आशिष शास्त्री याने त्याचे घरा बाजुला असलेल्या गोठ्यातुन टिनेच्या खाली गाडुन ठेवलेली एक देशी बनावटी लोखंडी स्टील धातुची माउझर काढुन दिली व माउझर चे मॅग्झीगमध्ये ४ जिवंत काडतुस मिळुन आल्याने आरोपीचा ताब्यातुन एक देशी बनावटी लोखंडी स्टील धातुची माउझर कि. ५०,०००/— चा व ४ जिवंत काडतुस किमंत ४०००/— रू चा असा एकुण ५४०००/— रू. माल जप्त करून आरोपीविरूध्द कलम ३/२५ भाहका सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला

सदर कार्यवाही मा. पोलीस हर्ष पोद्दार सा., मा. अप्पर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ सा., उपविभागिय पोलीस अधिक्षक संतोष गायकवाड सा. यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार अरविंदकुमार कातलाम सा. सपोनि अमरदिप खाडे, सपोनि स्वाती यावले, पोउपनि आरती नरोटे, डी.बी. पथक येथील प्रफुल राठोड, शैलेश यादव, मुकेश वाघाडे, कविता गोंडाने राजु भोयर, राजकुमार सातुर, आनंद देवकते, अमोल लोहकरे यांचे पथकाने पार पाडली आहे.

सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.



## पोस्टे देवलापार येथे अवैधरित्या जनावरांना कोंबुन वाहुन नेणा—या आरोपीतांना अटक

पोलीस स्टेशन देवलापार हद्दीत दिनांक ६/९/२०२४ रोजी पोलीस स्टॉफ यांचे पेट्रोलींग दरम्यान यातील कंटेनर क्र एन एल ०१—एजे १९१४ हे नागपुर ते जबलपुर रोडने भरधाव व निष्काळजीपणे चालवत येतांनी दिसला असता सदरचे कंटेनर थांबवुन बंद वाहन उघडुन पाहनी केली असता त्यामध्ये गौवंश जनावरांना कोंबुन त्यांना चारा पाण्याची कोणतीही सोय न लावता दाटी वाटी मध्ये कत्तली करीता वाहतुक करतांना दिसुन आल्याने सदर जनावराची पाहनी केली असता ३७ लाल रंगाचे गोरे गौवंश व ५ काळे रंगाचे गोरे गौवंश एकुन ४२ गोरे गौवंश प्रत्येकी किंमत १०,०००/—रू प्रमाणे एकुन किमती ४,२०,०००/— रू व पांढ—या रंगाचे कॅबीन व लाल रंगाचे कंटेनर गाडी क्र.एन एल ०१—एजे १९१४ किंमती १८,००,०००/—रू असा एकुन २२,२०,०००/—रू चा मुद्देमाल मिळुन आला. सदर गुन्हयातील कंटेनर क्र एन एल ०१—एजे १९१४ चा **चालक नामे** १) काळु रामनारायन बागरीया वय २२ वर्ष बछेडा पोस्ट मलीकपुर ता. मालपूरा जि. टोंक राजस्थान २) सुलेमान अहमेदनुर शेख वय २४ वर्ष रा कृइस्लामपुरा पोस्ट डिगी ता. मानपुरा जि. टोंक राजस्थान यांचे विरूध्द पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम २८१,३(५) भा. न्या. सं. सहकलम ११(१)(ड), प्रा.छ.प्र.अधि.सह कलम ५(अ),९ म. प्रा.स.का. सहकलम ११९, मपोका १८४ मोवाका अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी शरद गायकवाड सा.पोस्टे देवलापार मो न.९९२३९८८२९२ हे करीत आहे.

सदर कार्यवाही नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक मा. श्री हर्ष पोद्दार सा., अप्पर पोलीस अधिक्षक मा. श्री रमेश धुमाळ सा. यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुडे व त्यांचे स्टाफ ने पार पाडली आहे.

## डिझेल चोरी करणा—या आरोपीस अटक

**पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत दिनांक** ०७/०९/२०२४ रोजी नागपूर ते छिंदवााडा रोड बायपास पुलाखाली यातील ट्रक मालक नामे— मो. शाबाद वल्द मो. शरिफ, वय ४१ वर्ष रा. प्लॅट नं. ३४ राठोड लेआउट अनंत नगर पाोलीस लाईन टाकडी नागपूर याचे मालकीचे ट्रक सिटी ११४६ वर चालक व नौकर दिनेश उईके रा. सातनुर सौसर असून त्याच ट्रकवर अश्विन अजय गजभिये रा. बडेगाव ता. सावनेर जि. नागपूर हे होते. यातील आरोपी क्र. १) दिनेश सुरेश उईके वय ३९ वर्ष रा. वार्ड नं. ०४ सातनुर म.प्र. २) अश्विन अजय गजभिये रा. बडेगाव ता. सावनेर जि. नागपूर यांनी वडधामना नागपूर भारत पेट्रोलीयम येथुन फिर्यादी याने ट्रक मध्ये ४७३ लिटर डिझल किमत ४२८६८/— रू. चा भरून ठेवला असता यातील दोन्ही आरोपी यांनी फिर्यादीचा ट्रक घेवुन गेले व छिंदवाडा ते नागपूर बायपास पुलियाचे समोर उभे करून ट्रक मधील ३६९ लिटर किमंती ३३४३५/— रू. डिझेल ट्रक मधुन काढुन चोरी करून गेल्याचे फिर्यादीचे रिपोर्टवरून पोस्टे सावनेर येथे दोन्ही आरोपीविरूध्द कलम ३०६, ३(५), बीएनएस प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास नापोशि /८८० राजु वर्मा पोस्टे सावनेर हे करीत आहे

सदरची कारवाई मा. सदर कार्यवाही नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक मा. श्री हर्ष पोद्दार सा., अप्पर पोलीस अधिक्षक मा. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री उमेश पाटील व पोहवा राजेश पौनीकर , सुधाकर शेंदरे यांनी पार पाडली.

## पोस्टे बुट्टीबोरी येथे अवैधरित्या जनावरांना कोंबुन वाहुन नेणा–या आरोपीतांना अटक

**पोलीस स्टेशन बुटीबोरी हद्दीत** मौजा बोरखेडी टोल येथे दिनांक ०७.०९.२४ रोजी यातील फिर्यादी हे व त्याचे सोबतचे सहकारी हे विश्वहिन्दु परिषध्दचे कार्य. सह घटनास्थळी हजर असतांनी माहिती मिळाली कि ,गाडी क्र.एम एच ४० बी जी ७९८७ मध्ये जनावरे कोबुन घेवुन जात आहे. अशी माहिती मिळाल्याने खबरे प्रमाणे आयसर गाडी येतानी दिसली तिला थांबवुन गाडीची पाहणी केली असता, त्यामध्ये लाल पांढ–या रंगाचे बैल जातीचे १४ जनावरे एकुण किंमती ८०,०००/– रू त्याचे पाय, तोड व सिगे बांधलेली कोबुन दिसुन आली तसेच गाडी क्र.एम एच ४० बी जी ७९८७ कि. १५,००,०००/– रू. असा एकुन १५,८०,०००/– रू. चा माल अवैद्यरित्या विनापरवाना जनावरे कोबुन व निर्दयपणे कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गाडी चालक १) शेख वसीम शबीर शेख कुरेशी वय ३२ वर्ष रा कामठी नागपुर व मालक नामे २) मो.अब्दुल तवाब शेख वय २४ वर्ष रा कामठी नागपुर यांचे विरूध्द पोस्टे बोरी येथे कलम ११(१) (जी),११(१) (सी),प्रा.छ.प्र.अधि.सह कलम ५,अ,९ अ, म.प.स.१८४ मोवाका अन्वयें गुन्हा नोंद करून तपासात घेतला. पुढील तपास पो हवा अरविंद चव्हाण ७४९९६०४६७२ हे करीत आहे.

सदर कार्यवाही नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक मा. श्री हर्ष पोद्दार सा., अप्पर पोलीस अधिक्षक मा. श्री रमेश धुमाळ सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री प्रतापराव भोसले व त्यांचे स्टाफ ने पार पाडली आहे.

## कोळसा चोरी करणा–या आरोपीस अटक

पोस्टे कन्हान हद्दीत इंदर ओ.सी.एम डंबीग खदान नं ०३ कन्हान, पारशिवनी येथे दिनांक ०७/०९/२०२४ रोजी यातील फिर्यादी नामे – मंगेश मधुकरराव कोठाडे एम.एस.एफ सुरक्षा रक्षक डबलू सी.एल एरीया मधे स्टाफ सह गस्त करीत असतांना एक इसम इंदर डबीग मध्ये गस्त दरम्यान मोटार सायकल क्र.एम.एच. ४० बी.९०५० या मोटार सायकल वर दोन पोते कोळसा चोरून नेत असतांना त्याचा पाठलाग करून पकडले व त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव – मनोज कश्यप वय २५ वर्ष रा वार्ड.नं ०६ ता. कन्हान जि. नागपूर असे सांगून मोटार सायकल सोडून पळुन गेला, तरी मोटर सायकल .एम.एच. ४० बी. ९०५० अदांजे किमत १२०००/–रू व दोन बोरी कोळसा १७० कि. ग्राम किमंत ९००/–रू असा एकुन १२९००/–रू चा माल आरोपी कडुन मिळाल्याने आरोपीविरूध्द पोस्टे कन्हान येथे कलम ३०३(२) भा. न्याय सहिता अन्वयें गुन्हा नोंद करून तपासात घेतला. पुढील तपास पोना प्रशांत रंगारी मो ८३२९९१२८७२ हे करीत आहे.

सदर कार्यवाही नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक मा. श्री हर्ष पोद्दार सा., अप्पर पोलीस अधिक्षक मा. श्री रमेश धुमाळ सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील व त्यांचे स्टाफ ने पार पाडली आहे.

पोलीस माहीती कक्ष
नागपुर ग्रामीण जि नागपुर